# मुंबई विद्यापीठ

तात्काळ

माहिती अधिकार व विद्यार्थी
तक्रार निवारण कक्ष,

क्र.आरटीआयसी/आयसीडी/२०१८-१९/258

दिनांक : 24/7/२०१८

विषय :- माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ नियम ४(१)(बी) मध्ये सुचितकेल्यानुसार आपल्या विभागाची माहिती विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करणेबाबत

संदर्भ :- १) शासन परिपत्रक क्र. संकीर्ण २०१८/प्र. क्र.६६/सहा दिनांक १३ एप्रिल, २०१८

परिपत्रक :-

विद्यापीठातील सर्व विभागांचे संचालक/विभागप्रमुख, प्रभारी ग्रंथपाल, वित्त व लेखाअधिकारी, प्रभारी परीक्षा नियंत्रक, प्रभारी प्राचार्य सर ज.जी.वास्तुशास्त्र महाविद्यालय, नियंत्रक, मुद्रण व लेखन सामग्री आणि कुलसचिवांच्या कार्यालयातील सर्व विभाग/कक्ष प्रमुख यांना कळविण्यात येते की, उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांच्या वरील संदर्भीय परिपत्रकान्वये माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ नियम ४(१)(ख) मध्ये सुचित केल्यानुसार आपल्या विभागाची माहिती मुंबई विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द/अद्ययावत करण्यात यावी.

तसेच, सदर माहिती मुंबई विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द/अद्ययावत करण्यासाठी सिस्टीम ॲण्ड नेटवर्क मॅनेजर, विद्यापीठ संगणकीय केंद्र (U.C.C.), विद्यानगरी, मुंबई - ४०० ०९८ यांना (sanket@ucc.mu.ac.in) इमेलवर पाठविण्यात यावी व त्याची एक प्रत माहिती अधिकारी कक्षास (rtic713@gmail.com) इमेलवर अग्रेषित करावी.

(डॉ. दिनेश कांबळे)
कुलसचिव (प्र)

मुंबई - ४०० ०३२
दिनांक : 24/7/२०१८

सोबत: वरीलप्रमाणे

प्रति,
विद्यापीठातील विभागाचे संचालक / विभाग प्रमुख,
सर ज.जी. वास्तुशास्त्र महाविद्यालयाचे प्राचार्य,
विद्यापीठ ग्रंथालयाचे ग्रंथपाल,
परीक्षा नियंत्रक, प्रभारी वित्त व लेखा अधिकारी,
सर्व उपकुलसचिव, नियंत्रक, मुद्रण व लेखन सामग्री,